# भाजपच्या “रामराज्या”त भ्रष्टाचाराचे नवे विक्रम



## भगतसिंह जनअधिकार यात्रा

**बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचार, धर्मवाद आणि कष्टकरी जनतेच्या लुटीविरोधात!**

**रोजगार, शिक्षण, आरोग्यसेवा, निवास आणि झुंजार जन-एकजुटीसाठी!**

# भाजपच्या "रामराज्यात" भ्रष्टाचाराचे नवे विक्रम

BHAGAT SINGH JAN ADHIKAR YATRA

BSJAY

सहयोग मूल्य : 10 रुपये



*"कायदा जोपर्यंत जनतेचे मानस म्हणजे तिच्या भावना प्रकट करतो, तोपर्यंतच कायद्याचे पावित्र्य टिकवले जाऊ शकते. तो जेव्हा शोषक समूहांच्या हातातला कागदाचा कपटा बनतो, तेव्हा त्याचे पावित्र्य आणि महत्त्व तो हरवून बसतो. न्याय द्यायचा तर प्रत्येक प्रकारच्या लाभांचा आणि हितसंबंधांचा खातमा करणे ही मूळ बाब आहे. कायदा जसजसा सामाजिक गरजा भागवणे बंद करत जातो, तसतसा तो जुलूम आणि अन्याय वाढवण्याचे हत्यार बनत जातो. असे कायदे चालू ठेवणे याचा म्हणजे सार्वजनिक हितावर विशेष हितसंबंधांची ढोंगी जबरदस्ती आहे, दुसरे काहीही नाही."*

*-- शहीद-ए-आझम भगतसिंह*

---

भगतसिंह जनअधिकार यात्रेकरिता प्रकाशित
मे 2023
**प्रकाशक:** परमेश्वर जाधव, संपर्क: 77983 64729
**मुद्रणस्थळ:** आर. एस. प्रिंटर्स, 455, शनिवार पेठ, पुणे-411030
**सहयोग मूल्य:** रु. 10/-
www.bsjayatra.com, fb.com/bsjayatra

गेल्या काही वर्षांमध्ये आपल्या देशात घोटाळ्यांचे सर्व विक्रम ध्वस्त झाले आहेत. राफेल घोटाळा, पीएम केअर घोटाळा, एनपीए घोटाळा, व्यापम घोटाळा, अदानी घोटाळा… ही यादी मोठी आहे. ही गोष्ट वेगळी की बोफोर्स घोटाळा, चारा घोटाळा, कॉमनवेल्थ घोटाळा, टूजी घोटाळा इत्यादी पूर्वीच्या घोटाळ्यांवर जसा आवाज उठायचा तसा आज उठत नाही. त्याचं कारण म्हणजे **संपूर्ण मीडिया आज मोदी सरकारच्या मांडीवर जाऊन बसलाय, जो मोदी सरकारच्या भ्रष्टाचाराला सुद्धा सदाचाराचं उदाहरण म्हणून मांडत असतो.** त्याउपर संघ परिवाराची प्रचार यंत्रणा हिटलरच्या प्रचार यंत्रणेच्या पावलावर पाऊल ठेवत एखाद्या खोट्या गोष्टीला शंभर वेळा पुन्हापुन्हा सांगून खरे ठरवते! संघ परिवार गेली अनेक दशके न्यायव्यवस्था, पोलीस, लष्कर, नोकरशाही यांमध्ये आपली माणसे बसवत आला आहे आणि आज त्याचा परिणाम आपल्या समोर आहे. ज्या सगळ्या संस्था धनाढ्यांच्या नफेखोरीला वाहिलेल्या सध्याच्या व्यवस्थेत संतुलन राखण्याचे काम करत होत्या त्या आज मोदी-शहांच्या खिशात आहेत. त्यामुळेच मोदी सरकारने केलेल्या विक्रमी भ्रष्टाचाराचे संपूर्ण चित्र लोकांसमोर येऊच दिले जात नाही.

पण प्रत्येक गोष्टीला एक मर्यादा असते. अभूतपूर्व घोटाळ्यांची मालिका आता या टोकाला पोहोचली आहे की परदेशातही 'विश्वगुरू'चा डंका वाजू लागला आहे! अशा स्थितीत मोदी सरकार आणि संघ परिवाराला हे घोटाळे पूर्णपणे लपवणे कठीण झाले आहे.

**महागाई, बेरोजगारी आणि उपासमारीने त्रस्त असलेल्या सर्वसामान्य जनतेला मोदी सरकार सांगते की विकासासाठी काही काळ आपण आपले हक्क विसरून जावेत आणि फक्त आपल्या कर्तव्याविषयी बोलावे! संघ परिवार आणि भाजप आम्हाला "संस्कार", "संस्कृती", "राष्ट्रवाद" आणि "देशभक्ती"ची शिकवण देतात आणि "रामराज्य" आणण्यासाठी पोटाला चिमटा घेऊन त्याग करण्यास सांगतात! आपल्याला "संतोषम् परम् सुखम्" चा उपदेश दिला जातो. दुसरीकडे अदानी-अंबानी आणि भाजपच्या नेत्यांना आणि मंत्र्यांना त्यांच्या तिजोऱ्या आणि पोटं भरण्यासाठी भ्रष्टाचार करण्याची पूर्ण संधी दिली** जाते. त्यामुळे ज्या "चाल-चेहरा-चारित्र्याची" भाजप आणि संघ परिवार नेहमीच ग्वाही देतात, त्याचा फोलपणा पूर्ण उघड झाला आहे.

तशी तर सध्याची नफा केंद्रित व्यवस्था हीच स्वतःमध्येच घोटाळे आणि भ्रष्टाचाराचे न संपणारे चक्र आहे. देशाला स्वातंत्र्यापासूनच घोटाळे आणि भ्रष्टाचाराचा इतिहास

राहिला आहे. *जी व्यवस्था नफेखोरीला प्रोत्साहन देते, जी वैयक्तिक फायदा सर्वोच्च मानते, जी साम-दाम-दंड-भेद वापरून सत्ता आणि संपत्ती मिळवण्यालाच उद्देश म्हणून घोषित करते, समाजाच्या गरजेनुसार सर्व वस्तू व सेवांचे उत्पादन आणि वितरण न करता ज्यामध्ये उत्पादन आणि वितरण मुठभर धनाढ्यांच्या नफ्यासाठी केले जाते, जिथे नफ्याच्या अंध-वासनेचे राज्य चालते, तिथे नफेखोरी फक्त कायदेशीर मर्यादेत सीमित राहू शकत नाही!* तसे तर सर्व कारखाने, खाणी, शेतं, जमिनी यावर मोठ-मोठ्या शेठ, व्यापारी, कंत्राटदार, दलाल यांचा कबजा असणे हा सुद्धा एक भ्रष्टाचार आहे, पण हा भ्रष्टाचार 'नफा कमावण्याच्या स्वातंत्र्या'च्या नावाखाली विधीसंमत आहे. तसे पाहता, सुईपासून ते जहाजापर्यंत सर्व वस्तू बनविणाऱ्या मजुरांना देशातील सर्व संपत्ती निर्माण केल्यानंतर उपासमारीच्या पातळीवर जेमतेम जिवंत राहण्याएवढी मजुरी देऊन त्यांच्याकडून हाडतोड मेहनत करवून घेणे आणि त्या मेहनतीचे फळ मुठभर मालकांद्वारे बळकावले जाणे हा सुद्धा एक मोठा भ्रष्टाचार आहे, परंतु यालासुद्धा कायद्याची मान्यता आहे. **कायदेशीर मान्यताप्राप्त हे शोषण देखील भ्रष्टाचारच आहे. पण ज्या व्यवस्थेच्या केंद्रस्थानी कुठल्याही पद्धतीने नफा मिळविणे हेच सर्वकाही आहे, तिथे या मालक, कंत्राटदार, व्यापारी, मध्यस्थ, श्रीमंत शेतकरी आणि भांडवली-जमीनदार यांच्या नफ्याची लालसा कायदेशीर मर्यादांचे उल्लंघन करतेच आणि उघड-उघड भ्रष्टाचाराच्या रूपात म्हणजे लाचखोरी, कमिशनखोरी, सरकारी अधिकाऱ्यांनाच विकत घेणे, निविदा घोटाळे, किमतीत हेराफेरी करून खरेदी घोटाळे करणे, इत्यादी स्वरूपात प्रकट होते.**

आणि मोदीजींच्या "संस्कारी", "धर्मध्वजधारी", "राष्ट्रवादी" भाजप सरकारने या उघड भ्रष्टाचाराचे सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. भाजप सरकार सत्तेत आल्यापासून भ्रष्टाचाराचे हे आकडे अनेक पटींनी वाढले आहेत. अलीकडेच हिंडनबर्गने केलेल्या खुलाश्याने मोदी सरकार आणि अदानी यांच्यातील भ्रष्टाचारी संगनमताचे वास्तव तर उघड केलेच, सोबतच भाजपच्या 'नैतिकता', 'राष्ट्रवाद', 'विकास' वगैरे घोषणांचे वास्तवही उघड केले आहे. यापूर्वीसुद्धा पीएम केअर घोटाळा असो, राफेल घोटाळा असो की सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पातील घोटाळा, सर्वत्र भाजप सरकारकडून होत असलेल्या भ्रष्टाचाराने जुन्या घोटाळ्यांना मागे टाकले आहे. भाजप सरकारने 'देशभक्तीच्या' नावाखाली या घोटाळ्यांना लपवून टाकले आहे किंवा हिंदू-मुस्लिम, मंदिर-मशीद, 'लव्ह जिहाद', 'गोरक्षा' इ. खोट्या मुद्द्यांच्या वावटळीत त्यांना दाबून टाकले आहे.

अर्थात, भाजप व्यतिरिक्त केंद्रात सरकारमध्ये बसलेल्या या आधीच्या सर्व पक्षांनी आणि वेगवेगळ्या राज्यात सरकार चालवणाऱ्या पक्षांनी भ्रष्टाचार आणि जनतेची लूट करण्यात कोणतीही कसर सोडली नव्हती. परंतु भाजप सरकारने त्यांनी केलेल्या दाव्यांच्या अनुरूपच 'सत्तर वर्षातील सर्व विक्रम ध्वस्त केले आहेत.' आज मोदी सरकारच्या 9 वर्षांच्या कार्यकाळात 'बहुत सह लिया भ्रष्टाचार, अबकी बार मोदी सरकार' आणि 'ना खाऊंगा ना खाने दूंगा' यासारख्या घोषणांचा भंडाफोड झाला आहे.

आपल्याला हे आपल्या सामान्य अनुभवावरून माहीत आहे की या व्यवस्थेत ग्रामपंचायत निवडणुकीतही एखाद्या पदावर कोणी निवडून आले तर त्याच्या येणाऱ्या अनेक पिढ्यांची सोय होऊन जाते, आमदार-खासदार, मंत्री यांची तर बातच वेगळी आहे. याचे कारण म्हणजे सध्याची व्यवस्था जिला आपण लोकशाही म्हणतो, ती प्रत्यक्षात बहुसंख्य सामान्य कष्टकरी लोकांवर मुठभर बड्या धनाढ्यांची, श्रीमंतांची, मालकांची, कंत्राटदारांची, बड्या दुकानदारांची, बिल्डरांची, श्रीमंत शेतकऱ्यांची हुकूमशाही आहे. जेव्हा सरकारे "राष्ट्राचा विकास" आणि "राष्ट्रहिताच्या" गोष्टी करतात तेव्हा ते प्रत्यक्षात या मुठभर लुटारूंच्या विकास आणि हितांबद्दल बोलत असतात कारण देशातील बहुसंख्य कष्टकरी लोकसंख्या त्यांच्या "राष्ट्रा"च्या व्याख्येत येतच नाही. त्यांच्यासाठी "राष्ट्र" म्हणजे अंबानी, अडाणी, टाटा, बिर्ला यांसारखे मोठे धनाढ्य आहेत आणि त्यांचा नफा हेच "राष्ट्राचे" हित आहे. आपल्याला फक्त या "राष्ट्रहिता"साठी रोजंदारीने काबाडकष्ट करायचे आहे, जेणेकरून या श्रीमंतांच्या तिजोरीत आपले रक्त पैशाच्या स्वरूपात साचत राहील! हे सत्य पुन्हा एकदा तेव्हा समोर आले जेव्हा अदानींचा भ्रष्टाचार उघड करणाऱ्या हिंडनबर्ग अहवालाला अदानी आणि मोदी सरकारने "राष्ट्रावरील हल्ला" म्हटले! सध्याच्या व्यवस्थेत "राष्ट्र" म्हणजे दुसरे काही नसून श्रीमंत आणि धनदांडग्यांचा संपूर्ण समुदाय आहे.

याचप्रकारे भाजप सरकारच्या पहिल्या कार्यकाळात भ्रष्टाचार आणि काळा पैसा नष्ट करण्याच्या नावाखाली 'नोटबंदी' आणि 'जीएसटी' सारखी पावले उचलण्यात आली. या पावलांनंतर काळा पैसा परत येणे तर दूरच, सर्वसामान्यांच्या खिशात जे काही होते, तेही भांडवलदारांच्या तिजोरीत गेले. 'नोटाबंदी' आणि 'जीएसटी' नंतर देशातील बड्या श्रीमंतांच्या संपत्तीत अब्जावधींची वाढ झाली आहे. दुसरीकडे सामान्य जनता जिला रांगेत उभे केल्यानंतर "पन्नास दिवसांत देशाचा कायापालट" करण्याचे स्वप्न दाखविले गेले होते; तिची गरिबी आणि विपन्नावस्था आणखी वाढली आहे.

**खरेतर स्वतंत्र भारताच्या इतिहासात नोटाबंदी हा सर्वात मोठा घोटाळा होता. नोटाबंदीनंतर काळा पैसा कुठे पकडला गेला?** जवळपास 99 टक्के नोटा बँकेत परत आल्या! म्हणजे ज्यांच्याकडे काळा पैसा होता त्यांनीही मोदीजींच्या कृपेने तो पांढरा केला. दुसरीकडे, नोटाबंदीने छोट्या भांडवलाचा मोठ्या प्रमाणावर नाश झाला, ज्यामुळे अदानी-अंबानी, टाटा-बिर्ला यांसारख्या मोठ्या भांडवलदारांचा प्रचंड फायदा झाला. नोटाबंदीचा खरा उद्देश पण हाच होता, ज्यासाठी देशातील जनतेला अतोनात त्रास सहन करावा लागला आणि शेकडो लोकांना आपले प्राण गमवावे लागले. पण गोदी मीडियाच्या प्रचार यंत्रणेने हा गुन्हा लपवण्यासाठी आणि लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी नाटकी, गोंधळी प्रचाराचा इतका मारा केला की मोदी सरकारचा हा भयंकर भ्रष्टाचारही 'राष्ट्रवादी कारवाई' ठरला!

भाजप सरकारच्या काही मोठ्या घोटाळ्यांवर थोडा प्रकाश टाकूयात.

## हिंडनबर्गचा भंडाफोड आणि अदानी-मोदी सरकारचा घोटाळा

हिंडनबर्ग या 'ॲक्टिविस्ट शॉर्ट सेलर संस्थेने अदानीच्या कंपन्यांबाबत केलेल्या अलीकडील प्रकटीकरणामुळे भाजपने केलेल्या घोटाळे आणि भ्रष्टाचाराच्या काळ्या इतिहासात एक नवीन अध्याय जोडला गेला आहे. या खुलाशात हिंडनबर्गने आकडेवारी आणि तथ्यांद्वारे सिद्ध केले आहे की, भाजप सरकारच्या 'रामराज्या'मध्ये अदानी यांनी अल्पावधीतच भांडवलाचा जो मोठा डोंगर उभा केला त्याच्या मागे वास्तवात अनेक दशकांपासून **स्टॉक किंमती आणि हिशेब-पुस्तकांमध्ये हेराफेरी करण्याची, विदेशी 'टॅक्स हेवन' मध्ये आपल्याच कुटुंबियांद्वारे संचालित बनावट शेल कंपन्यांच्या माध्यमातून आपलेच पैसे आपल्याच कंपनीत परत गुंतवणूक** करून त्यांच्या शेअर्सच्या किमती वाढवून आणि या वाढलेल्या किमतींद्वारे देश आणि जगातील सर्व वित्तीय संस्थांकडून मोठमोठी कर्जे घेण्याची तिकडमबाजी काम करत आहे.

हिंडनबर्ग रिसर्चने अदानी समूहाच्या कंपन्यांवर 2 वर्षांपर्यंत केलेल्या आपल्या संशोधनाच्या अहवालात दावा केला आहे की अदानी समूहाच्या 7 सूचीबद्ध कंपन्यांच्या शेअरच्या ज्या किमती गेल्या 3 वर्षांत सरासरी 819 टक्क्यांनी वाढल्या आहेत, त्या फसवणुकीच्या माध्यमातून झाल्या आहेत. ह्या फसवणुकीच्या पद्धती स्पष्ट करताना अहवालात पुराव्यासह दाखवले गेले आहे की अदानी समूहाने 'टॅक्स हेवन्स' म्हटल्या जाणाऱ्या मॉरिशस, सायप्रस, यूएई, सिंगापूर आणि कॅरेबियन बेटांच्या विविध देशांमध्ये शेल (नकली) कंपन्यांचे जाळे तयार केले आहे, ज्याला गौतम अदानीचा मोठा भाऊ

विनोद अदानी नियंत्रित करतो. विदेशातील या बनावट कंपन्यांमध्ये बेकायदेशीरपणे अदानी समूहाचाच पैसा लागलेला आहे आणि याच पैशातून अदानीच्याच स्वतःच्या सूचीबद्ध कंपन्यांचे शेअर्स भारतात परत विकत घेतले जातात, आणि अशा प्रकारे या कंपन्यांच्या शेअर्सच्या मागणीत वाढ करून त्याची किंमत कृत्रिमरीत्या वाढवली जाते. भारतीय शेअर बाजाराचे नियामक असलेल्या सेबी (सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया) च्या नियमांनुसार, सूचीबद्ध कंपनीच्या शेअर्समध्ये प्रवर्तकांचा हिस्सा 75 टक्क्यांपेक्षा जास्त असू शकत नाही. परंतु शेल कंपन्यांच्या वरील बनवाबनवीच्या मदतीने अदानीच्या 7 सूचीबद्ध कंपन्यांमधील अदानी कुटुंबाची भागीदारी 75 टक्क्यांहून कितीतरी अधिक झाली आहे.

एवढेच नाही तर अदानी समूह आपल्या कंपन्यांच्या शेअर्सच्या वाढीव किमती आणि त्यांची चांगली स्थिती दाखवून देशी-विदेशी वित्तीय संस्थांकडून मोठमोठी कर्जे घेत आला आहे, ज्याची रक्कम त्यांच्या वास्तविक मालमत्तेच्या मूल्यापेक्षा कितीतरी जास्त आहे. अशाप्रकारे, अदानी समूहाच्या कंपन्यांच्या शेअर्सच्या किमती त्यांची वास्तविक स्थिती दर्शवत नाहीत, उलट त्यांच्या वास्तविक स्थितीवर पडदा टाकण्याचे काम करतात. हा सट्टेबाजीद्वारे फुगलेला फुगा आहे, ज्याच्या जोरावर सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि वित्तीय संस्थांमधूनसुद्धा अदानीने जनतेच्या कष्टाचे लाखो कोटी रुपये कर्ज म्हणून घेतले आहेत. काय हे मोदी सरकारच्या संगनमताशिवाय शक्य आहे? स्वतः विचार करा. असे होऊ शकते का?

सत्य हे आहे की अदानीच्या या कंपन्यांमध्ये एलआयसीसह देशातील एसबीआय आणि पीएनबी सारख्या बँकांमध्ये जमा असलेली सर्वसामान्यांची रक्त-घामाची कमाईही झोकली गेली आहे, जी कधीही बुडू शकते. खरे तर भ्रष्टाचाराचा हा सारा डोंगर सरकारच्या संगनमताशिवाय उभाच राहू शकत नाही. **आपल्याला कधी मोदीजी अदानीच्या विमानातून प्रवास करताना दिसतात, तर कधी अदानी मोदींच्या विमानातून प्रवास करताना दिसतात ते उगाच नव्हे.**




खरे तर मोदीजींची अदानी सोबतची ही मैत्री खूप जुनी आहे. मोदी सरकारच्या पहिल्याच कार्यकाळात 'इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली' या नियतकालिकाने मोदी आणि अदानी यांच्यातील संबंध उघडकीस आणत मांडले होते की मोदी सरकारने अदानीच्या कंपन्यांच्या फायद्यासाठी एसईझेड (विशेष आर्थिक क्षेत्र) संबंधित नियमांमध्ये बदल केले होते.

एवढंच नाही तर अदानीच्या कंपन्यांवर कर चोरीचे अनेक आरोप झाले आहेत. ईपीडब्ल्यूच्या याच लेखात हेसुद्धा सांगितले आहे की अदानीच्या कंपन्यांना फायदा व्हावा म्हणून सरकारने कस्टम ड्युटीशी संबंधित नियमात अनेक वेळा बदल केले आहेत. अशाच प्रकारे यापूर्वी देशातील अनेक विमानतळ सुद्धा सरकारने अदानीकडे सोपवली होती, ज्यासाठी सर्व नियम-कायद्यांमध्ये असे बदल करण्यात आले जेणेकरून अदानीला हे विमानतळ ताब्यात घेण्याच्या मार्गात कोणताही अडथळा येणार नाही.

याआधीही अदानींवर भ्रष्टाचाराचे अनेक आरोप लागत आले, मात्र देशाचे प्रधानमंत्री मोदी यांचे मित्र असल्या कारणाने त्यांच्या विरोधात कधीही चौकशी झाली नाही. प्रधानमंत्री मोदींच्या मैत्रीचाच हा परिणाम होता की, करोना महामारीच्या काळात जेव्हा संपूर्ण देश भयंकर संकटाचा सामना करत होता, त्यावेळी अदानी-अंबानींसह देशातील भांडवलदारांची संपत्ती अब्जावधींनी वाढत होती.

## पीएम केअर्स घोटाळा: मोदीजी काळजी करतात, तेव्हासुद्धा एक 'राष्ट्रवादी' घोटाळा होऊन जातो!

कोरोना महामारीच्या काळात देशातील जनतेला ज्या शोकांतिकेचा सामना करावा लागला, त्याच्या भयंकर आठवणी एका दुःस्वप्नाप्रमाणे आपल्याला **छळत राहतील**. गंगेत तरंगणारे मृतदेह, रुग्णालयांमध्ये ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे तडफडणारे आणि मरणारे लोक कधीच विसरता येणार नाहीत. क्वचितच अशी एखादी व्यक्ती असेल जिने या भयंकर संकटात आपल्या जवळच्या व्यक्तीला गमावले नसेल. देशातील ढिसाळ आरोग्य व्यवस्थेचा भंडाफोड झाला होता. पण मोदी सरकारने या भीषण संकटाच्या काळात **'संकटाचे संधीत रूपांतर करा' असा नारा** देत जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले. कोरोना महामारी शिखरावर पोहोचली असताना सरकारने लोकांच्या मदतीसाठी **पीएम केअर्स** नावाचा निधी जाहीर केला. प्रधानमंत्र्यांना 'पीएम केअर्स' ट्रस्टचे अध्यक्ष बनवण्यात आले आणि त्याच्या सदस्यांमध्ये परराष्ट्र मंत्री, गृहमंत्री आणि अर्थमंत्री यांचा समावेश केला गेला. पण ते बनवण्याच्या प्रक्रियेपासून ते त्याच्या संरचनेपर्यंत सर्व गोष्टी बघता ते फसवणूकीशिवाय दुसरे काही नव्हते.




**सरकारने स्वतःच याबाबत न्यायालयाला सांगितले की, हा एक खाजगी ट्रस्ट आहे, ज्यामध्ये 'प्रधानमंत्री'**

**शब्दाचा केवळ वापर करण्यात आला आहे.** लोकांनी याला सरकारी योजना समजून मोठ्या प्रमाणावर देणगी द्यावी यासाठीच हे केले गेले हे उघड आहे. विविध सरकारी संस्थांनी आपल्या कर्मचाऱ्यांचा एक दिवसाचा पगार कापून या खासगी ट्रस्टमध्ये देण्याची घोषणा केली. बऱ्याच ठिकाणी तर आधीच अस्तित्वात असलेल्या सरकारी 'प्रधानमंत्री मदत निधी' च्या नावावर पैसे कापून ते 'पीएम केअर्स' या खासगी ट्रस्टमध्ये जमा करण्यात आले.

**या खाजगी ट्रस्टला सर्व प्रकारच्या पारदर्शकतेच्या आणि चौकशीच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आले. 'पीएम केअर्स' निधीचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षक (कॅग) द्वारे ऑडिट केले जाणार नाही जे की प्रत्येक सरकारी संस्थेसाठी आवश्यक असते.** या निधीमध्ये मर्जीनुसार कितीही रक्कम जमा केली जाऊ शकते. यासाठी कोणतीही मर्यादा निश्चित केलेली नाही. यामध्ये दिलेल्या देणगी रकमेवर कलम ८०(जी) अंतर्गत आयकरातून सूट दिली जाईल. नंतर अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि कॉर्पोरेट मंत्रालयाने देखील हे स्पष्ट केले की जर कंपन्यांनी पैसे दिले तर त्याला कंपन्यांच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) मध्ये समाविष्ट केले जाईल. विचार करण्यासारखी बाब आहे की कंपन्या सीएसआरच्या त्यांच्या बजेटमधून राज्यांच्या 'डिझास्टर रिलीफ फंडा'सारख्या सरकारी संस्थेला देणगी देऊ शकत नाहीत, मात्र सीएसआर मधून पीएमकेअर्समध्ये पैसे ओतण्याची योजना तयार करण्यात आली. या कंपन्यांना राज्यांना देणगी देण्यासाठी कोणतीही सूट मिळणार नव्हती. म्हणजे पैसे द्यायचे असतील तर थेट मोदींच्या झोळीत टाका, इतर कुठेही नाही! खरं तर, कोरोना महामारीच्या काळात मृत्युमुखी पडणाऱ्या लोकांच्या मृतदेहांवर पीएम केअर्सच्या नावाखाली मोठा भ्रष्टाचार करण्यात आला.

भ्रष्टाचाराचा हा खेळ इथेच थांबला नाही. **बीबीसीने आरटीआय आणि इतर माध्यमांद्वारे केलेल्या तपासणीत असे दिसून आले आहे की पीएमकेअर्स फंडातून व्हेंटिलेटर खरेदीच्या ऑर्डर्स अशा कंपन्यांना देण्यात आल्या होत्या ज्यांना व्हेंटिलेटर बनवण्याचा कोणताही अनुभव नव्हता.** इतकेच नाही तर एकाच प्रकारचे व्हेंटिलेटर वेगवेगळ्या कंपन्यांकडून सात ते आठ पट किमतीच्या फरकाने खरेदी केले गेले.

पण जर घोटाळा "रामराज्य" आणि "धर्मरक्षणा"च्या नावाने केला गेला तर तो स्वतःच "पवित्र" आणि "राष्ट्रवादी" ठरतो. तरीही भाजपच्या या "चाल-चेहरा-चरित्रा"कडे कोणाचे लक्ष गेलेच तर जनतेला मूर्ख बनविण्यासाठी मंदिर-मशीद, हिंदू-मुस्लीम, पाकिस्तान, चीन आणि इतर सर्व खोट्या मुद्द्यांची हवा पसरवण्यासाठी गोदी

मीडिया तर आहेच.

## सेंट्रल विस्टा घोटाळा

इतकंच नाही तर कोरोना महामारीच्या याच काळात देशातील कष्टकरी जनतेचा कष्टाचा पैसा ऐयाशीत उडविण्यासाठी मोदी सरकारने 'सेंट्रल व्हिस्टा' प्रोजेक्ट नावाचा नवा खेळ रचला. **विचार करण्यासारखी गोष्ट आहे की ज्या देशात एक मोठी लोकसंख्या (सुमारे 36 कोटी) झोपडपट्ट्यांमध्ये आणि फुटपाथवर झोपते, त्या देशात सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पावर 20,000 कोटी रुपये ऐशआरामासाठी खर्च करणे देशातील गरीब-विपन्न जनतेची खिल्ली उडवणे नाही का? परंतु हे कामही 'राष्ट्रवादी' पद्धतीने होत असेल, तर योग्य आहे!** हा प्रकल्प सुरू होताच, सेंट्रल व्हिस्टा प्रकल्प किती महत्त्वाचा आहे आणि तो पूर्ण झाल्यानंतर देशातील सर्वसामान्यांच्या जीवनात किती बदल होणार आहे, याचे वातावरण टीव्ही-चॅनल्स, मीडीयाने ठिकठिकाणी निर्माण केले. तसे पाहिल्यास अमेरिका, इंग्लंड आणि युरोपातील अनेक देशांच्या संसदेच्या इमारती भारताच्या संसद भवनापेक्षा खूप जुन्या आहेत. पण आपला वृथा अभिमान मिरवण्यासाठी मोदी सरकारने सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पच सुरू केला नाही, तर कोरोनाच्या काळात विशेष कायदा आणून त्याच्या बांधकामाचा अत्यावश्यक सेवांमध्ये समावेश करण्यात आला, जेणेकरून कोरोनाच्या काळातही त्याच्या बांधणीत अडथळे येऊ नयेत. महामारीच्या काळात देशाची आरोग्य व्यवस्था सुधारण्यासाठी एवढी मोठी रक्कम खर्च केली असती तर मोठ्या लोकसंख्येला कोविडच्या संकटातून वाचवता आले असते हे उघड आहे. हा प्रकल्प म्हणजे अजून काही नाही तर, राजकारणी-नोकरशहांच्या वायफळ बडबडीचा आणि ऐयाशीचा अड्डा बनवण्यासाठी जनतेच्या कष्टाने कमावलेल्या पैशाची उधळपट्टी आणि स्वत:हूनच एक घोटाळा आहे.

## राफेल घोटाळा

जीप घोटाळ्यांपासून ते बोफोर्स खरेदीपर्यंत, देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून संरक्षण घोटाळ्यांचा मोठा इतिहास आहे. **लोकांमध्ये सैन्याची प्रतिमा अशा प्रकारे तयार केली जाते की सैन्य हे काहीतरी "दैवी" आहे आणि त्यावर प्रश्न उपस्थित करणे देशद्रोह आहे.** हे यासाठी केले जाते की "अंधराष्ट्रवादाच्या" उन्मादात बुडवून खरे प्रश्न दृष्टिआड करवता यावेत. खरे तर आपलीच मुले-मुली सैन्यात भरती होतात, ज्यांना ऑर्डरली समजून सर्व अधिकारी त्यांचा अपमान करतात, त्यांच्या छळाला

कंटाळून अनेक सामान्य सैनिक आत्महत्याही करत आहेत; पण अमित शहांचा मुलगा जय शहासारख्या अब्जाधीशांना, ज्यांना क्रिकेटचा ‘एबीसी’ही माहीत नाही, बीसीसीआयचे अध्यक्ष बनवले जाते. हा स्वत:हूनच एक घोटाळा नाही का? **भाजपच्या लोकांनाही सैन्याप्रती इतकीच भावना आहे तर त्यांनी सुद्धा आपल्या मुला-मुलींना सैन्यात शिपाई म्हणून भरती करून का न घ्यावे?** मात्र, लष्कराच्या नावाखाली ‘राष्ट्रवादाच्या’ खोट्या लाटेद्वारे जनतेची फसवणूक करण्याचा आणि या लाटेत आपल्या गैरकृत्यांवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या भाजपने पहिल्यांदा केंद्रात सत्तेवर येताच **सैनिकांच्या शवपेटी खरेदीत घोटाळा** करून आपल्या सच्चा ‘राष्ट्रवादी’ असल्याचा पुरावा सादर केला होता. दुसऱ्यांदा सत्तेत आल्यावर भाजप सरकारने राफेल खरेदीच्या नावावर नवा विक्रम रचला आहे.

या घोटाळ्यामागील कथा यूपीए सरकारच्या काळात तेव्हा सुरू झाली जेव्हा फ्रेंच कंपनी डसॉल्टने 2012 मध्ये बोली लावून भारताला लढाऊ विमानांचा पुरवठा करण्याचे कंत्राट मिळवले. भारत सरकार **530 कोटी रुपये प्रति विमान दराने 18 विमाने** खरेदी करेल आणि भारत सरकारची कंपनी हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड हे तंत्रज्ञान आत्मसात करून 108 विमाने तयार करेल, असा करार होता. पण मोदी सरकारने सत्तेत येताच हा करार रद्द केला आणि या फ्रेंच कंपनीकडून **प्रति विमान 1600 कोटी या दराने 36 विमाने** खरेदी करण्याची घोषणा केली. मोदी सरकारने दावा केला की यामागील कारण विमाने अपग्रेड होत आहेत हे आहे, पण सत्य हे आहे की या नवीन करारामागील **मुख्य कारण अंबानींना फायदा देण्याचे होते. एच.ए.एल. (हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड) ही सरकारी कंपनी या करारातून गायब झाली** आणि तिची जागा डसॉल्ट आणि रिलायन्स यांच्यातील संयुक्त उपक्रमाने घेतली. संरक्षण आणि लष्कराच्या नावाखाली या घोटाळ्याला मोदी सरकारने दाबून टाकले.

पण उघड्या डोळ्यांनी बघता येणाऱ्या या घोटाळ्याला मोदी सरकारच्या गोदी मीडियाने ‘राष्ट्रवाद’ आणि ‘देशभक्ती’ चा पर्यायी शब्दच बनवून टाकला. “राष्ट्रवाद हा सर्व चोर, गुंड आणि बदमाशांचा शेवटचा आश्रय आहे” असे कोणीतरी बरोबरच म्हटले होते.




## स्पर्धा परिक्षांमध्ये पेपरफुटी आणि घोटाळ्यांचा कहर

भाजप सरकारच्या राजवटीत स्पर्धा परीक्षांमध्ये

घोटाळा ही एक सामान्य गोष्ट झाली आहे. सिव्हिल सर्व्हिसेसपासून ते राज्य स्पर्धा परिक्षापर्यंतच्या परीक्षांमध्ये पेपर फुटणे हा एक सामान्य नियम बनला आहे. अनेक परीक्षांमध्ये पेपरफुटी होत नाही, पण त्यातही भ्रष्टाचार आणि फसवणूक होते हे उघड गुपित आहे. प्रत्येक वेळी पेपरफुटीनंतर सरकार काही सॉल्व्हर्सना पकडून, काही अधिकारी-कर्मचाऱ्यांवर दोषारोप करून, पेपर फुटणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याच्या गप्पा मारून सारवासारव करू लागते. पण **यामागचे खरे मोठे खेळाडू कधीच समोर येत नाहीत**. एवढेच नाही तर या परीक्षांमधील घोटाळे आणि भ्रष्टाचाराविरोधात बोलणाऱ्या विद्यार्थी आणि तरुणांचे ऐकण्याऐवजी त्यांच्यावर लाठीमार केला जातो.

याच पद्धतीचा एक घोटाळा म्हणजे मध्य प्रदेशातील **व्यापम घोटाळा, जो भाजपच्या शिवराज सिंह चौहान सरकारच्या काळात झालेला एक भीषण रक्तरंजित घोटाळा होता, ज्यामध्ये खरे गुन्हेगार लपविण्यासाठी 50 हून अधिक लोकांची हत्या** करण्यात आली. पण आपण मूळात हे समजून घेतले पाहिजे की अशा हेराफेरी आणि भ्रष्टाचाराच्या घटना का घडतात?

पहिली गोष्ट म्हणजे आज नेते-मंत्री, अधिकारी, शिक्षण माफिया आणि बड्या कोचिंग इन्स्टिट्यूटची एक संपूर्ण यंत्रणा कार्यरत आहे. राज्य सेवा परीक्षेच्या नोकरभरतीत भ्रष्टाचार झाल्याच्या प्रकरणात अनेक बड्या कोचिंग संस्थांची नावे समोर आली आहेत. याचप्रकारे गेल्या जानेवारी 2020 मध्ये भाजप नेते चंद्रमा यादव यांना टीईटी परीक्षेत कॉपीचा कट रचल्याप्रकरणी पोलिसांनी अटक केली होती. चंद्रमा यादव हे बजरंग दलाचे विभाग निमंत्रक आणि मंत्री सिद्धार्थनाथ सिंह यांचे प्रतिनिधी देखील आहेत. अशा प्रकारे "धोक्यात असलेल्या हिंदू धर्माचे रक्षण" होत आहे! दिवसा 'गोरक्षण' आणि 'लव्ह जिहाद'च्या नावाखाली निरपराध अल्पसंख्याकांना मारायचे आणि रात्री नोटा छापण्यासाठी घोटाळे करायचे! दुप्पट "राष्ट्रसेवा"! **69,000 शिक्षकांच्या भरती प्रकरणाचा भंडाफोड करणाऱ्या अलाहाबाद मधील एका पोलीस अधिकाऱ्याची लगेच बदली करण्यात आली**. या परीक्षांचे पेपरही सरकारी छापखान्यात छापण्याऐवजी खासगी संस्थांकडून छापले जातात. अनेक परीक्षांमधील पेपरफुटीत खासगी छापखान्यांचा सहभागही समोर आला आहे. याप्रकारचा कोणताही **भ्रष्टाचार, हेराफेरी किंवा कागदपत्रे फुटणे अशा घटना सत्तेतील साऱ्या यंत्रणांच्या संगनमताशिवाय घडणे शक्य नाही, हे उघड आहे.**

दुसरे म्हणजे, आजच्या काळात सरकारी नोकऱ्यांची संख्या सातत्याने कमी होत

आहे. सर्व पदे कंत्राटी पद्धतीने भरली जात आहेत. सरकारी नोकऱ्या देत असलेल्या सामाजिक सुरक्षिततेमुळे विद्यार्थी-युवकांची मोठी लोकसंख्या सरकारी नोकऱ्यांसाठी तयारी करते. ज्यांच्याकडे पैसा-संसाधने इत्यादी स्त्रोत आहेत, ते या परीक्षांमध्ये कोणत्याही प्रकारे उत्तीर्ण होऊन स्वत:साठी एक जागा काढू पाहतात. परीक्षेचा पेपर विकत घेण्यासाठी लाखो रुपये खर्च करणे हे कोणत्याही सामान्य विद्यार्थ्यांच्या क्षमतेबाहेरचे आहे, त्यामुळे. परिक्षांमध्ये असा भ्रष्टाचार करून गरीब विद्यार्थ्यांना संधी नाकारल्या जात आहेत.

गोरक्षणाचे संपूर्ण प्रकरण हाही मोठा घोटाळाच आहे. **भाजप गायीला माता मानत असेल तर गोवा, केरळ, ईशान्येकडील राज्यांमध्ये ती माता का नाही? गोमांस पुरवठ्यात कोणतीही कमतरता पडणार नाही, असे आश्वासन तेथील भाजप नेते जनतेला का देत आहेत? जर गाय ही माता असेल तर संपूर्ण जगाला गोमांस पुरवणाऱ्या देशांमध्ये भारत अव्वल का आहे? भाजप सगळे कत्तलखाने का बंद करत नाही? भाजप नेते सणबोर शुल्लई म्हणाले की, चिकन आणि मटणापेक्षा गोमांस जास्त खावे. मेघालयातील भाजप नेते अर्नेस्ट मोरी म्हणाले "मी गोमांस खातो, मला कोणीही रोखू शकत नाही"! गोरक्षक असल्याची बतावणी करणारे संघी गुंड त्यांच्या मागे का जात नाहीत? भाजपचे दंगलखोर नेते संगीत सोम हे स्वतः हलाल मांस निर्यात करणाऱ्या अल-दुआ या कंपनीचे संचालक होते. द्वारका पीठाचे स्वामी स्वरूपानंद सरस्वती यांनी सांगितले की, गोमांस निर्यात करणाऱ्या बहुतांश कंपन्या भाजपच्याच मालकीच्या आहेत आणि मोदींच्या कार्यकाळात गोमांस निर्यातीने सर्व विक्रम मोडले आहेत. हा दुटप्पीपणा नाही का?** खरे तर गोमांसाचा मुद्दा हा केवळ जनतेला मूर्ख बनवण्यासाठी आणि खऱ्या समस्यांपासून, म्हणजे रोजगार, महागाई, भ्रष्टाचार इत्यादींपासून जनतेचे लक्ष वळवण्यासाठी आहे. तरीही या बोगस बाबींमागे आपण जात राहिलो तर तो आपला मूर्खपणा ठरेल आणि त्याची किंमत आपण चुकवू. भारतासारख्या देशात काय परिधान करावे, काय खावे, कुठे राहावे, कोणती भाषा व संस्कृती अंगीकारावी, कोणते काम करावे, कोणता धर्म पाळावा किंवा पाळू नये, ही प्रत्येक नागरिकाची वैयक्तिक बाब आहे आणि जोपर्यंत एक नागरिक दुसऱ्या नागरिकाच्या वैयक्तिक स्वातंत्र्यात हस्तक्षेप करत नाही, तोपर्यंत प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या इच्छेनुसार जीवन जगण्याचा अधिकार आहे, या सर्वांबद्दल लोकशाहीचे मूलभूत तत्त्व अमलात आणूनच अनावश्यक डोकेफोड थांबवता येतील. पण फॅसिस्ट संघ परिवार आणि भाजप सरकार या मूलभूत लोकशाही नियमाला बगल

देत गैर-मुद्द्यांना मुद्दा बनवतात, लोकांना आपापसात भांडायला लावतात, गोरक्षणाच्या नावाखाली रक्तपात घडवतात, आणि गोमांस निर्यात करून त्यांचेच लोक करोडपती होतात.

हा सुद्धा मोठा भ्रष्टाचार आहे, ज्यामुळे आपल्याला फसवले जात आहे. किमान आता तरी जागे होऊन मूलभूत लोकशाही तत्त्वे अंगीकारण्याची गरज आहे.

## एनपीए घोटाळा आणि लोकांच्या कष्टाच्या कमाईला घेऊन फरार झालेले भांडवलदार

मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर आणखी एक नवीन घटना देशासमोर आली. मोदी सरकारच्या पहिल्या कार्यकाळात विजय मल्ल्या, नीरव मोदी, मेहुल चोक्सी आणि आयपीएल कमिशनर ललित मोदी असे अनेक भांडवलदार भ्रष्टाचार करून देशातील जनतेच्या कष्टाच्या पैशांची लूट करून फरार झाले. भारतीय बँकांमधील लोकांच्या रक्त-घामातून जमा केलेले 9,000 कोटी रुपये रिचवून विजय मल्ल्या देशाबाहेर पळाल्यानंतर, **भाजप नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी स्वतः ट्विट केले की, विजय मल्ल्या यांनी पलायनाच्या एक दिवस आधी तत्कालीन अर्थमंत्री अरुण जेटली यांची भेट घेऊन लंडनला सोडण्याबद्दल बोलले होते.**

त्याचप्रमाणे भारतातून पळून जाऊन अँटिग्वाचे नागरिकत्व घेतलेल्या मेहुल चोक्सीबद्दल तेथील सरकारनेच सांगितले की, **भारतीय अधिकाऱ्यांकडून एनओसी मिळाल्यानंतरच त्याला तिथले नागरिकत्व देण्यात आले. मेहुल चोक्सीची प्रधानमंत्री नरेंद्र मोदींशी असलेली जवळीक कोणापासून लपलेली नाही.**

कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या भांडवलदारांना मदत करण्याबरोबरच भाजप सरकारने देशातील भांडवलदारांना दिलेल्या कर्जाचा मोठा हिस्सा 'राईट ऑफ' म्हणजे बुडीत खात्यात टाकला आहे, जो कधीही वसूल होणार नाही. गेल्या **6 वर्षांत बँकांनी 11.17 लाख कोटी रुपयांची कर्जे माफ केली आहेत**. एवढेच नाही तर देशातील जनतेच्या कष्टाच्या पैशातून निर्माण झालेली सर्व संपत्तीही कवडीमोल भावाने त्यांच्या झोळीत टाकली जात आहे, जेणेकरून ते त्यात पैसे गुंतवून नफा मिळवू शकतील. एकीकडे सामान्य गरीब माणसाने नाईलाजाने छोटे-मोठे कर्ज घेतले आणि ते परत केले नाही, तर त्याची मालमत्ता जप्त होते किंवा त्याला तुरुंगात जावे लागते; पण **मल्ल्या-मोदी-चोक्सी यांसारखे भांडवलदार मात्र जनतेच्या अब्जावधी रुपयांना बुडवून विदेशात मौजमजा करत आहेत. मोदी सरकारने परदेशातून काळा पैसा**

**आणण्याची भाषा केली होती, पण प्रत्यक्षात मोदींच्या मित्रांनी भारतातून लुटून परदेशात काळा पैसा ओतला आहे!** पण "धर्मरक्षणासाठी" हे सर्व "राष्ट्रवादी" पद्धतीने केले तर मात्र ठीक आहे! जर अजूनही त्यांच्या "नैतिकता", "कर्तव्य", "संस्कार", "राष्ट्रवाद", "धर्मध्वजरक्षा" या मूर्खपणाने आपण प्रभावित असू, तर आपल्यापेक्षा मोठा मूर्ख कोणीच असू शकत नाही असे म्हणता येईल. नुसते मोठ्याने "देऽऽऽश" बोलून कोणीही देशभक्त होत नाही! आणि जोरजोरात "विकाऽऽऽऽस" म्हटल्याने प्रगतीशील बनत नाही. **देशप्रेमी आणि प्रगतिशील असण्याचा अर्थ आहे शहीद-ए-आझम भगतसिंह प्रमाणे देशातील कष्टकरी लोकांच्या बाजूने उभे राहणे, लढणे आणि परजीवी शोषक धनाढ्यांची सत्ता नष्ट करण्यासाठीची खरी लढाई लढणे. कारण देश हा कागदावर बनलेला नकाशा नसतो तर तो तेथील कष्टकरी लोकांचा बनलेला असतो.**

भगतसिंग यांनी लिहिले होते की, **कायद्याचे पावित्र्य तोपर्यंतच राखले जाऊ शकते जोपर्यंत तो लोकांच्या भावनांचे प्रतिबिंब असेल.** जेव्हा तो शोषक गटाच्या हातातील एक शस्त्र बनतो, तेव्हा तो त्याचे पावित्र्य आणि महत्त्व गमावून बसतो. आज देशातील सर्व भ्रष्टाचार आणि घोटाळ्यांना कायदेशीर पेहराव घालण्यात आला आहे. भांडवलदारांच्या हितासाठी सरकारे सर्व कायदे बदलवत आहेत किंवा धाब्यावर बसवत आहेत. त्या बदल्यात भांडवलदार वर्ग त्यांच्या पक्षांना कोट्यवधी रुपयांच्या देणग्या देत आहे. भांडवलदार आणि पक्षांची अपवित्र युती जनतेसमोर उघड होऊ नये म्हणून टीव्ही-चॅनल्स आणि मीडिया या भांडवलदारांची चोवीस तास स्तुती करतात. भाजपचे 'सद्गुणी' चारित्र्य यावरूनही समजू शकते की, इलेक्ट्रोरल बॉण्ड्सला (निवडणूक रोखे) अपारदर्शक बनवून त्यांनी निवडणूकबाज पक्षांना मिळालेल्या देणग्यांना अधिक गूढ केले आहे, जेणेकरून या सत्यावर पडदा टाकता येईल. हा योगायोग नाही की 2021-22 मध्ये एकट्या भाजपला भांडवलदारांकडून 614 कोटी रुपयांची देणगी मिळाली, आणि त्या तुलनेत भांडवलदार वर्गाच्या इतर पक्षांना फारच कमी देणग्या मिळाल्या. कारण भाजप हाच एकमेव असा पक्ष आहे जो भांडवलदार वर्गाचा घसरता नफ्याचा दर सावरण्यात आजच्या संकटाच्या काळात सर्व प्रकारचे नियम-कायदे धाब्यावर बसवून सर्व प्रकारच्या भ्रष्टाचार-घोटाळ्यांद्वारे मदत करू शकतो, आणि दुसरीकडे जात-धर्म, मंदिर-मशीद, हिंदू-मुस्लिम यांच्या नावाने जनतेच्या असंतोषाला दुसरीकडे वळवू शकतो. भांडवलशाहीचे संकट जसजसे वाढत जाईल, तसतसा भाजपचा "चाल-चेहरा-चरित्र" उघड होत जाईल.

## आपल्या मागण्या

- हिंडनबर्ग घोटाळा, राफेल घोटाळा, पीएम केअर घोटाळ्याची उच्च पातळीवर चौकशी झाली पाहिजे आणि दोषी आढळलेले सर्व कंपनी मालक, व्यवस्थापक आणि नेत्यांना तुरुंगात टाकले पाहिजे, मग तो व्यक्ती प्रधानमंत्री असेल तरीही.
- भांडवलदारांकडून पक्षांना मिळालेल्या सर्व प्रकारच्या देणग्या उघड कराव्यात. भांडवलदारांकडून दिल्या जाणाऱ्या निवडणूक निधीचे नियमन झाले पाहिजे, त्याची सखोल चौकशी झाली पाहिजे.
- निवडणूकबाज पक्ष आणि सरकार यांच्या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी जनतेच्या सार्वजनिक समित्यांच्या देखरेखीची आणि सार्वजनिक लेखापरीक्षणाची व्यवस्था करावी.
- सर्व तपास आणि देखरेख संस्था सरकारच्या नियंत्रणातून बाहेर काढाव्यात.

| यात्रेचा व्हॉलंटियर फॉर्म भरण्यासाठी हा क्यु.आर. कोड स्कॅन करा.करा. | यात्रेबद्दल अधिक माहितीकरिता हा क्यु.आर. कोड स्कॅन करा. | यात्रेच्या व्हाट्सअप ग्रुपसोबत जोडून घेण्यासाठी हा क्यु.आर. कोड स्कॅन करा. |
|---|---|---|

## आयोजक

# भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष (RWPI)

## नौजवान भारत सभा, दिशा विद्यार्थी संघटना, स्त्री मुक्ती लीग, महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियन

## संपर्क

**महाराष्ट्र:** परमेश्वर 7798364729, बबन 9619039793
**दिल्ली:** योगेश 9289498250, प्रियंवदा 9693469694
**उत्तर प्रदेश:** अमित 8858288593, अविनाश 9891951393
**हरियाणा:** इंद्रजित 8010156365, अजय 8685030984
**बिहार:** अजित 6297974751, वारुणी 7070571498
**उत्तराखंड:** कविता 9971158783, अपूर्व 7042740669
**पंजाब:** इंजिंदर 9888080820, सुखजिंदर 9815705653
**आंध्र प्रदेश:** श्रीनिवास 7995828171, अरुणा 8500208259
**तेलंगणा:** आनंद 9971196111; **चंडिगढ:** शुभम 8196803093

WhatsApp Number : 9923875414 /bsjayatra